MHSO100002162013

## नि.दि.दा.क्र.५३/२०१३ मधील निशाणी क्र.२१६ खालील आदेश

वादींनी सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिताचे, क्रम–६, नियम–१७ प्रमाणे प्रतिवादी क्र.१२ ही मयत झाल्यामुळे तिचे नाव दाव्यातून कमी करण्यासाठी दुरुस्तीसाठी परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे. त्यांनी सदरच्या अर्जात कथन केले आहे की, प्रतिवादी क्र.१२ राधाबाई पंढरीनाथ दुरापे हिचे वारस हे प्रतिवादी क्र.१३ ते १८ हे आहेत. त्यांच्याशिवाय दुसरे कोणीही वारस नाहीत. प्रतिवादी क्र.१२ ही ता.१०.०३.२०१४ रोजी मयत झाली आहे. सदरचे दाव्यात मयत राधाबाई दुरापे हिचे संपुर्ण वारस अभिलेखावर घेतलेले आहेत. त्यामुळे वेगळे वारस अभिलेखावर घेणे आवश्यक नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र.१२ चे नाव दाव्यातून कमी करणे आवश्यक आहे. सदरच्या दुरुस्तीमध्ये मुळ दाव्याचे स्वरुपात कोणताही बदल होत नाही. म्हणून त्यांनी त्यांचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

२. सदरचे अर्जास प्रतिवादींनी जबाब दिलेला असून त्यामध्ये म्हटले आहे की, सदरचे अर्जास त्यांची हरकत असुन सदरचा अर्ज कायदेशीर नाही. त्यामुळे सदरचा अर्ज रद्द होण्यास पात्र आहे.

३. वर नमूद केलेल्या कथनांचा विचार करुन माझे विचारार्थ खालील मुद्दे आहेत व त्या मुद्दयावर मी माझे कारणांसह निष्कर्ष नोंदवित आहेः–

| अ.क्र. | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | सदरचा अर्ज मंजूर करणे ... आवश्यक आहे काय? | **होय.** |
| २. | आदेश काय? | **... अंतिम आदेशाप्रमाणे** |

**नि.क्र.२१६ खालील आदेश.**

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ बाबतः–**

४. मी वादींतर्फे विद्वान वकील श्री.कदम व प्रतिवादींतर्फे विद्वान वकील श्री.फडे यांचा युक्तिवाद ऐकला. तसेच सदरच्या प्रकरणांमधील संबंधीत दस्तऐवज पाहिले. प्रतिवादी क्र.१२ ही ता.१०.०३.२०१४ रोजी मयत झाल्याचे दिसुन येते. प्रतिवादी क्र.१२ हिचे वारस अभिलेखावर असल्याचे दिसुन येते. प्रतिवादी क्र.१२ ही मयत झाल्यामुळे तिच्या नावासमोर मयत लिहिण्यास व तिचे नावासमोर कंस करुन तिचे नाव कमी करण्यास परवानगी देणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर ''होकारार्थी'' नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.२ बाबतः–**

५. मी वर नमुद केल्याप्रमाणे सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणुन मी मुद्दा क्र.२ चे उत्तरासाठी खालील अंतिम आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

सदरचा निशाणी क्र.२१६ चा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

Digitally signed by GHANWAT SOPAN DASHRATH
Date: 2025.10.04 10:20:19 +0530

ता.०३.१०.२०२५.

(सो.द.घनवट)
दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर,
माळशिरस.

**<u>नि.दि.दावा क्र.५३/२०१३.</u>**

**<u>नि.क्र.२१६ खालील आदेश.</u>**

**शेरा**

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ. आदेश फाईल मधील मजकूर हा मूळ आदेशातील मजकूराशी शब्द न शब्द सारखा आहे.

लघुलेखकाचे नावःश्री.म.पां.सदाफुले.

न्यायालयाचे नावःदि. न्या. व. स्तर, माळशिरस.

न्यायनिर्णयाचा मजकूर सांगितल्याचा दि.०३.१०.२०२५.

न्यायनिर्णय टंकलिखित केलेला दि.०३.१०.२०२५.

न्यायनिर्णय स्वाक्षरीत केल्याचा दि.०३.१०.२०२५.

न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दि.०४.१०.२०२५.

स्वाक्षरीत/-

दि.०४.१०.२०२५.

(म.पां.सदाफुले)
लघुलेखक ग्रेड – २,
दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
माळशिरस.